जलदगती न्यायालय, परांडा, जिल्हा-उस्मानाबाद या नव्याने स्थापन केलेल्या न्यायालयाकरिता फर्निचर सुविधेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांक: जगन्या १११८/१५/प्र.क्र.०५/का.९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- २० जानेवारी, २०१८

<u>संदर्भ</u> :- १) शासन निर्णय वित्त विभाग क्र. बीजीटी-२०.१०/प्र.क्र.६६/अर्थसंकल्प-२, दि.१०.०८.२०१०
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग- २, दि.१७.४.२०१५
३) शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्र. जगन्या-१४१६/प्र.क्र.२०४/का.९, दि.१८.८.२०१७
४) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.B(W) ६०४३/१९९९/(५९)/३४२३/२०१७, दि.२६.१२.२०१७
५) जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद यांचे पत्र क्र.काव्यवि/प्रशा/८४९१/२०१७, दि.१३.१०.२०१७

<u>प्रस्तावना</u> :-

प्रबंधक (निरीक्षणे-२), उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांनी दि.२६.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये जलदगती न्यायालय, परांडा, जिल्हा-उस्मानाबाद हे कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक फर्निचर सुविधेच्या कामासाठी रु.१,३७,०००/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केलेली आहे. तसेच जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद यांनी दि.१३.१०.२०१७ च्या पत्रान्वये सदर जलदगती न्यायालयासाठी आवश्यक फर्निचरबाबत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, परांडा यांनी तयार केलेले अंदाजपत्रक सादर केले होते. त्यानुसार सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

दि.१८.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये १४ व्या वित्त आयोगांतर्गत स्थापन केलेल्या जलदगती न्यायालय, परांडा, जिल्हा-उस्मानाबाद कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक कार्यालयीन फर्निचर व इतर कामे करण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार रु.१,६५,१८९/- (एक लक्ष पासष्ट हजार एकशे एकोणनव्वद फक्त) इतक्या रकमेस खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

i. जलदगती न्यायालय, परांडा करिता आवश्यक फर्निचर विहित प्रमाणीकृत आकारमानाचे असावे. ते महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तीकेच्या परिशिष्ट २६ मध्ये विहित

केलेल्या फर्निचरच्या प्रमाणाच्या धर्तीवर आणि प्रत्यक्ष कर्मचारी वृंदांची संख्या विचारात घेऊन निश्चित करावे.

ii. याप्रकरणी नेहमीची कार्यपद्धती आणि इतर सर्वसाधारण निर्देशांचे अनुपालन करण्यात यावे.

२. याकरिता येणारा खर्च मागणी क्रमांक जे-१, २०१४-न्यायदान, १०२-उच्च न्यायालये, (१३) १४ व्या वित्त आयोगांतर्गत योजना, (१३)(०१) जलदगती न्यायालये (अनिवार्य), संकेतांक क्रमांक (२०१४ ०५९३), १३-कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.२०/इमा-२, दि.०९/०१/२०१८ व वित्तीय अधिकार नियम पुस्तीका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-दोन मधील अ.क्र.३७, नियम क्र.९० अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०१२५१२०६४३४२१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Santosh Sampatti Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=214b4345a2842afe7dd0cbda9e8d83579cbedaaaef30f215ceda096e4e407797, serialNumber=0cb1b0de020015cf6d1f800579271f4816460b1802c2ae247dd6dd6f47462cd3, cn=Santosh Sampatti Navagire
Date: 2018.01.25 12:11:16 +05'30'

(सं.सं. नवगिरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१) मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
२) प्रबंधक (निरीक्षणे १ व २), उच्च न्यायालय, मुंबई.
३) प्रबंधक (वित्त व अर्थसंकल्प), मा. उच्च न्यायालय, मुंबई
४) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद.
५) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, उस्मानाबाद.
७) वित्त विभाग (व्यय/५), मंत्रालय, मुंबई.
८) सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई
९) कार्यासन अधिकारी, कार्यासन २३/२४/२५, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती-का.९.